NAKODA GROUP OF INDUSTRIES LIMITED
Plot No. 239, South Old Bagadganj, Small Factory Area, Nagpur 440 008. Maharashtra, INDIA.
CIN Number : L15510MH2013PLC249458
+91 712 2778824
+91 712 2721555
info@nakodas.com
www.nakodas.com

NAKODAS®

Date: - 15th November, 2024

To,

**National Stock Exchange of India Ltd. (NSE Ltd)**
Exchange Plaza, 05th Floor,
Plot No. C-1, Block G,
Bandra Kurla complex, Bandra (E) Mumbai – 400051

**NSE Scrip Code: - NGIL**

**BSE Limited (BSE Ltd)**
Listing / Compliance Department,
Phiroze jeejeebhoy Towers,
Dalal Street, Mumbai – 400001

**BSE Scrip Code:-541418**

**Sub: - Submission of Newspaper Advertisement with respect to publication of Standalone Un-Audited Financial Results for the Quarter ended 30th September, 2024.**

Dear Sir/Madam,

Pursuant to regulation 47 and other applicable provisions of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirement) Regulations, 2015, we enclosed herewith the Newspaper publication copies of the extract of Standalone Un-Audited Financial Results for the Quarter ended on 30th September, 2024, published in below mentioned Newspapers on Saturday, 15th November, 2024.

1. English Daily: - "Indian Express" Dated 15.11.2024.

2. Regional Language Daily: - "Loksatta" Dated 15.11.2024.

You are requested to please take the note of same in your record.

Kindly acknowledge the receipt of the same.

**For Nakoda Group of Industries Limited**

PRAVIN NAVALCHAND CHOUDHARY

Digitally signed by PRAVIN NAVALCHAND CHOUDHARY
Date: 2024.11.15 16:50:36 +05'30'

**Pravin Choudhary**
**Managing Director**
**DIN: 01918804**

Encl: - As Above

# सूर्यकुमारच्या विश्वासामुळेच कामगिरी शक्य!

## तिसऱ्या स्थानावर फलंदाजीसाठी प्रोत्साहन दिल्याने बळ; शतकवीर तिलक वर्माची भावना

**पीटीआय, सेंच्युरियन**

**दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या** तिसऱ्या ट्वेन्टी-२० सामन्यात कर्णधार सूर्यकुमार यादवने मी तिसऱ्या स्थानी फलंदाजी करणार असल्याचे सांगितले. त्यावेळी मी कर्णधाराचा माझ्यावरील विश्वास सार्थ ठरविण्याचा निर्णय घेतला. मी सामन्यात शतक झळकावले आणि ते केवळ कर्णधाराच्या विश्वासामुळेच शक्य झाले, अशी भावना शतकवीर तिलक वर्माने व्यक्त केली. तिलक वर्माने सामन्यात ५१ चेंडूंमध्ये शतक झळकावले आणि शतकी खेळीनंतर बॅट उंचावत सूर्यकुमारचे आभारही मानले. या सामन्यात सूर्यकुमारने तिलक वर्माला फलंदाजी क्रमवारीत आपल्या पुढे बढती दिली आणि हाच निर्णय संघाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला.

''कर्णधार सूर्यकुमारने मला तिसऱ्या स्थानावर फलंदाजी करण्याची संधी दिली. मला तिसऱ्या स्थानी फलंदाजी करण्यास आवडते. मी गेल्या दोन सामन्यांत चौथ्या स्थानी फलंदाजीस येत होतो. सामन्याच्या आधी सूर्यकुमारने मला तिसऱ्या स्थानी फलंदाजीत उतरण्यास सांगितले. त्याने मला ही तुझ्यासाठी चांगली संधी असून मोकळेपणाने खेळ, असे सांगितले. तू दाखवलेल्या विश्वासाला मी मैदानात सार्थ ठरवेन, असे सूर्यकुमारला म्हणालो,'' असे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ११ धावांनी विजय मिळवत मालिकेत आघाडी घेतल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत तिलक वर्माने सांगितले. तिलकने ५६ चेंडूंत १०७ धावांची नाबाद खेळी केली. यादरम्यान त्याने सात षटकार व आठ चौकार झळकावले.

''जेव्हा आम्ही लयीत नव्हतो तेव्हा संघ व्यवस्थापनाने आमच्यावर विश्वास दाखवला. भारतीय संघ ज्या खेळासाठी ओळखला जातो, त्याप्रमाणे खेळा, असे त्यांनी आम्हाला सांगितले. कर्णधार व संघ व्यवस्थापन (अंतरिम प्रशिक्षक व्हीव्हीएस लक्ष्मण) यांनी गडी बाद झाले तरीही मोकळेपणाने खेळण्याचा विश्वास दिला,'' असे तिलक म्हणाला. बोटाला झालेल्या दुखापतीमुळे तिलकला झिम्बाब्वे व श्रीलंकेच्या दौऱ्याला मुकावे लागले होते. मात्र, संधी मिळाल्यास धावा करू असा विश्वास तिलकला होता.

''मला दुखापतीमुळे दोन मालिकांमध्ये सहभागी होता आले नाही. या मालिकेत मला धावा करण्याची संधी होती व मी ती गमावली. मला वाईट वाटत होते. मात्र, मी संयम गमावला नाही. मी दुखापतीतून सावरल्यानंतर मेहनत घेतली. संधी मिळाल्यास धावा करण्याचा विश्वास मला होता. मी मोठ्या खेळीसाठी संधीच्या प्रतीक्षेत होतो. गेल्या सामन्यात ती संधी मिळाली नाही. मात्र, कर्णधार व संघ व्यवस्थापन यांनी मला चांगला पाठिंबा दिला. त्यांच्यामुळे ही खेळी करणे शक्य झाले,'' असे तिलकने सांगितले.



### भारताची मालिकेत आघाडी

- तिलक वर्माच्या (नाबाद १०७) शतकी खेळीच्या जोरावर भारताने तिसऱ्या ट्वेन्टी-२० सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर ११ धावांनी विजय मिळवला. या विजयामुळे भारताने चार सामन्यांच्या मालिकेत २-१ अशी आघाडी मिळवली.
- प्रथम फलंदाजी करताना भारताने २० षटकांत ६ बाद २१९ अशी धावसंख्या उभारली. यानंतर आव्हानाचा पाठलाग करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेला २० षटकांत ७ बाद २०८ धावाच करता आल्या.

### चौथा सामना आज; रिंकूकडे लक्ष

**जोहान्सबर्ग :** दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शुक्रवारी होणाऱ्या निर्णायक चौथ्या ट्वेन्टी-२० सामन्यात मालिका जिंकण्याच्या प्रयत्नात असलेल्या भारतीय संघाला रिंकू सिंहच्या खराब लयीची चिंता असेल. संजू सॅमसन व तिलक वर्मा यांच्या शतकांशिवाय भारतीय फलंदाजांना चमक दाखवता आलेली नाही. भारतीय संघ मालिकेत २-१ असा आघाडीवर आहे आणि मालिका जिंकायची झाल्यास फलंदाजांना कामगिरी उंचवावी लागेल. भारतासाठी वॉन्डरर्स नेहमीच चांगले राहिले आहे. एका वर्षापूर्वी गेल्या ट्वेन्टी-२० मालिकेत कर्णधार सूर्यकुमार यादवने शतक झळकावत संघाला विजय मिळवून दिला होता. सूर्यकुमारच्या नेतृत्वाखाली भारताने १६ पैकी १३ सामने जिंकले आहेत. यावेळी भारताचा प्रयत्न मालिका जिंकण्याचा असेल.

- वेळ : रात्री ८.३० वा.
- थेट प्रक्षेपण : स्पोर्ट्स १८-१, जिओ सिनेमा.

# भारताचा थायलंडवर दणदणीत विजय

**राजगीर (बिहार) :** आघाडीच्या फळीतील युवा खेळाडू दीपिकाने नोंदवलेल्या पाच गोलच्या जोरावर भारतीय महिला हॉकी संघाने गुरुवारी आशियाई चॅम्पियन्स करंडक हॉकी स्पर्धेत थायलंडवर १३ गोलने मात केली. या विजयासह गतविजेते असलेल्या भारताने दोन सामने शिल्लक असतानाच उपांत्य फेरीतील स्थान निश्चित केले.



विश्रांतीच्या दिवसानंतर गुरुवारी झालेला सामना अगदीच एकतर्फी झाला. भारतीय खेळाडूंनी जणू त्यांच्या इच्छेनुसार गोल केले. थायलंडला एकही फलका भारताच्या गोलपोस्टच्या दिशेने मारता आला नाही. भारताकडून दीपिकाने (तिसऱ्या मिनिटाला, १९व्या मि., ४३ व्या मि., ४५व्या मि.व ४५व्या मि. अधिक) पाच गोल केले. प्रीति दुबे (नवव्या मि. आणि ४०व्या मि.), लार्लेमसियामी (१२व्या मि., ५६व्या मि.), मनीषा चौहान (५५व्या मि. व ५८ व्या मि.) यांनी प्रत्येकी दोन गोल केले. अन्य दोन गोल ब्युटी डुंग डुंग (३०व्या मि.) आणि नवनीत कौर (५३व्या मि.) यांनी केले. भारताचा पुढील सामना शनिवारी चीनशी होणार आहे.


## NAKODA GROUP OF INDUSTRIES LIMITED

Registered Office: Plot No. 239, South Old Bagdganj, Small Factory Area, Nagpur - 440008, MH - IN
Email: info@nakodas.com CIN NO.: L15510MH2013PLC249458 Website: www.nakodas.com

**Extract of Un-Audited Financial Results for the Quarter & Half Year ended September 30, 2024**

(Rs. In Lakhs except EPS)

| S. No. | Particulars | Quarter Ended | | | Half Year | | Year Ended |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 30.09.2024 Unaudited | 30.06.2024 Unaudited | 30.09.2023 Unaudited | 30.09.2024 Unaudited | 30.09.2023 Unaudited | 31.03.2024 Audited |
| 1 | Total Income from Operations | 939.51 | 866.35 | 1,272.43 | 1,805.87 | 2,201.59 | 4,713.38 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | -86.82 | -72.62 | -65.08 | -159.44 | -43.22 | -285.95 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | -86.82 | -72.62 | -65.08 | -159.44 | -43.22 | -285.95 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | -64.00 | -55.75 | -48.70 | -119.75 | -32.34 | -211.69 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | -63.88 | -55.64 | -47.93 | -119.51 | -30.86 | -211.26 |
| 6 | Equity Share Capital | **1,399.77** | **1,272.51** | **1,113.45** | **1,399.77** | **1,113.45** | **1,272.51** |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year. | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 457.59 |
| 8 | Earnings Per Share (for continuing and discontinued operations) - | | | | | | |
| | Basic | -0.42 | -0.44 | -0.44 | -0.86 | -0.29 | -1.77 |
| | Diluted | -0.42 | -0.44 | -0.44 | -0.86 | -0.29 | -1.77 |

**NOTES :-**

1. The figures for the corresponding previous period have been regrouped / re-casted / reclassified, wherever necessary, to make them comparable for the purpose of preparation and presentation of the unaudited financial results.
2. The unaudited financial results for all periods have been prepared in accordance with Indian Accounting Standards ("Ind AS") notified under section 133 of the Companies Act, 2013, read together with the Companies (Indian Accounting Standards) Rule, 2015, as amended from time to time and other recognized accounting practices and policies to the extent applicable.
3. The Company operates only in one segment i.e. manufacturing, selling, distribution and trading of Tutty Fruity and trading of Cotton Bales and other Agro commodities, hence the Indian Accounting Standards (Ind AS) – 108, "Operating Segments" is not applicable to the Company.
4. The Company has neither Subsidiary nor Associates and Joint Venture, hence, the reporting under the Indian Accounting Standard (Ind AS) - 110, "Consolidated Financial Statements" is not applicable.
5. On July 06, 2024, the Company has made right issue of 50,90,056 equity shares, face value of Rs. 10/- each at a premium of Rs. 15/- per equity share. The application and allotment money on such right issue was Rs. 6.25/- per equity share, which includes share premium of Rs.3.75/- per equity share.
6. The above unaudited financial results were reviewed and recommended by the Audit Committee and subsequently the same has been approved by the Board of Directors at their respective meetings held on November 14, 2024. The Statutory Auditor has issued unmodified review report on these unaudited financial results.
7. As per the Regulation 46(2) of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements), Regulation, 2015, the unaudited financial results are available on the Company's website; www.nakodas.com

Place:- Nagpur
Date:- 14.11.2024

For Nakoda Group of Industries Limited
SD/-
Pravin Choudhary
Chairman & Managing Director
(DIN:- 01918804)


# विदर्भाची दमदार सुरुवात


**विदर्भ :** गुजरातच्या तळातील फलंदाजांचा प्रतिकार रोखण्यात यश मिळाल्यावर यजमान विदर्भाने रणजी लढतीत दुसऱ्या दिवसअखेरीस २ बाद २०२ अशी दमदार सुरुवात केली. विदर्भ पहिल्या डावातील आघाडीपासून अजून १४१ धावांनी पिछाडीवर आहे.

विशाल जैस्वालच्या शतकी खेळीच्या जोरावर उभा राहिलेला गुजरातचा डाव दुसऱ्या दिवशी फार काळ तग धरू शकला नाही. पहिल्या दिवसाच्या ६ बाद २८१ वरून गुजरातचा डाव आणखी ६२ धावांची भर घालून ३४३ धावसंख्येवर संपुष्टात आला. विशालने ११८, तर कर्णधार चिंतन गाजाने नाबाद ८६ धावांची खेळी केली. विदर्भाकडून प्रफुल हिंगे, आदित्य ठाकरे आणि नचिकेत भुते यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले. अर्थव तायडे (१३) आणि ध्रुव शोरे (२७) हे भरात असलेले फलंदाज लवकर बाद झाले. पण, त्यानंतर दानिश मालेवर (नाबाद ७६) आणि करुण नायर (नाबाद ८१) यांनी तिसऱ्या गड्यासाठी १५२ धावांची नाबाद भागीदारी करताना विदर्भाच्या डावाला स्थिरता आणली.

# शमी ऑस्ट्रेलियाला जाण्याची शक्यता

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियाच्याा आव्हानात्मक दौऱ्यात अडचणींचा सामना करत असलेल्या भारतीय संघामध्ये मोहम्मद शमी सहभागी होऊ शकतो. भारताच्या या अनुभवी वेगवान गोलंदाजाने रणजी करंडक सामन्यात चार गडी बाद करत पुनरागमन केले.

भारतीय संघासाठी शमीची लय ही चांगली गोष्ट आहे. मात्र, राष्ट्रीय निवड समिती दुसऱ्या डावात तो कशी गोलंदाजी करतो याकडेही लक्ष देईल.






हे पत्र मुद्रक आणि प्रकाशक विरेंद्र विद्याधर रानडे यांनी मालक, दि इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - दि इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी लोकमत, प्लॉट नं. १९२, २०७ आणि २०८, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर-४४११०८ येथे छापून प्लॉट. नं. ३८, अॅडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, अंबाझरी ले-आऊट, अंबाझरी, नागपूर-४४००१० येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी क्रमांक : २२३०४२१, २२३६८९७, फॅक्स क्रमांक : २२३६९८६. लोकसत्ता मुंबई कार्यालय : मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोयंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी क्रमांक : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. पुणे कार्यालय : एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००, फॅक्स : ०२०६७२४११४७. ■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोयंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ निवासी संपादक : देवेंद्र गावंडे* (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Loksatta, RNI. No. 54743/92, Dated 30-4-92.© दि. इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.